॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. २१ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेच्या वतीने आज बुधवार, दि.२० फेब्रुवारी पासून `ॲडव्हान्सेस् इन कॉम्प्युटिंग` या राष्ट्रीय कार्यशाळेला प्रारंभ झाला.

या कार्यशाळेचे उद्‌घाटन शिपींग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष प्रदीप घावडे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील होते. यावेळी मंचावर प्रशाळेचे संचालक डॉ.बी.व्ही.पवार, समन्वयक प्रा.आर.जी.रामटेके, सचिव प्रा.संदीप भामरे, प्रा.के.एल.ई इन्स्टटयूट ऑफ मॅनेजमेंट हुबळीचे प्रा.पी.एस.हिरेमठ, भारती विद्यापीठाच्या संगणक अभियांत्रिकी विभागप्रमुख एस.डी.जोशी, सीडॅकचे सहसंचालक वैनतेय कोरटकर उपस्थित होते.

प्राकृतीक भाषा संसाधन, इमेज प्रोसेसिंग, इन्फोर्मेशन रिट्रेव्हल या सध्याच्या संगणकशास्त्रातील प्रश्नांवर या कार्यशाळेत संशोधन व सादरीकरण करण्यात येणार आहे. उद्‌घाटकीय भाषणात श्री.घावडे यांनी या क्षेत्राचे महत्व अधोरेखित केले. अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा.पाटील यांनी विद्यापीठासाठी आवश्यक असणारे सॉफ्टवेअर संगणकशास्त्रातील विद्यार्थी आणि शिक्षकांनी तयार करुन दिल्यास आवश्यक ते सहकार्य दिले जाईल अशी ग्वाही दिली. प्रा.आर.जे.रामटेके यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.निता पाटील यांनी केले. डॉ.संदीप भामरे यांनी आभार मानले. या कार्यशाळेत २०० पेक्षा अधिक संशोधक, प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे. उद्या गुरुवार, दि. २१ फेब्रुवारी रोजी कार्यशाळेचा समारोप होईल.

---

**बातमी क्र.२**

जळगाव. दि. २० ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षांमार्फत बी.टेक व एम.टेकच्या विद्यार्थ्यांसाठी नुकतीच कार्यशाळा घेण्यात आली.

यु.आय.सी.टी.चे माजी विद्यार्थी गोकुळ महाजन जे सध्या जीक्सॉन इंडिया प्रा.लि.मुंबई येथे प्रोसेस सेफ्टी इंजिनिअर म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी या कार्यशाळेत स्वप्नापर्यंत पोहोचण्याचा मार्ग या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उद्योजकांच्या अपेक्षा, मुलाखतीची तयारी, सकारात्मक दृष्टीकोन, उच्च शिक्षण या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत सुमारे १०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. कक्षाच्या समन्वयक डॉ.भूषण चौधरी, डॉ.यु.डी.पाटील, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट ऑफिसर कविता मंडोरे आदी उपस्थित होते.

---

**बातमी क्र.३**

जळगाव दि.१८ ( ) श्री.श्री.रविशंकर यांच्या चंदीगड विद्यापीठात झालेल्या ड्रग मुक्त भारत या कार्यक्रमाचे थेट वेबकास्ट कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सोमवारी दाखविण्यात आले.

विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र प्रशाळेच्या सभागृहात या कार्यक्रमाचे थेट वेबकास्ट दाखविण्यात आले. त्यावेळी प्रशाळेचे संचालक प्रा.एस.टी.इंगळे, रासेयोचे संचालक प्रा.पंकजकुमान नन्नवरे, सहायक कुलसचिव एन.जी.पाटील हे उपस्थित होते. गेल्या काही महिन्यांपासून आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक श्री.श्री.रविशंकर यांनी भारतातील युवकांमधील वाढती व्यसनाधिनता दूर करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून सोमवारी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या पुढाकाराने चंदीगड विद्यापीठात ड्रग मुक्त भारत अभियानाचा प्रारंभ झाला. एकाच वेळी देशातील हजारो महाविद्यालयात या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी आपआपल्या ठिकाणी ड्रग विरोधी शपथ घेतली. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी देखील ही शपथ घेतली. वर्षभर हे अभियान राबविले जाणार आहे.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : २० फेब्रुवारी, २०१९

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-